स. क्रि. केस नं. १५४/२०२१

निशाणी – २२ लगत

**फिर्यादीचा उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री.एम.एम.शिंदे यांचे मार्फत सुरु**

१२. माझे शिक्षण डिप्लोमा सिव्हील इंजिनिअर झाले आहे. माझ्याकडे बांधकाम कॉट्रॅक्ट घेण्याचा परवाना आहे. त्या परवान्याचा नंबर मला सांगता येणार नाही. हे खरे की, एखाद्या जागेचे बांधकाम करायचे असेल तर त्या बांधकामाचा करार त्या जागेच्या मुळ मालकाशी केला जातो. मी कॉट्रॅक्टचा व्यवसाय सन २०१७ करतो. हे खरे नाही की, बांधकामाचे कॉट्रॅक्ट घेताना मी आर्किटेक्चर डिझाईन स्वतः करत नाही. हे खरे की, बांधकामाचा करार करताना ते बांधकाम कोणत्या स्वरुपाचे असणार आहे याचा करारात उल्लेख असतो. हे खरे की, करारात बांधकामाचा दर्जा व त्याकरीता वापरले जाणारे सामान याचा उल्लेख असतो. हे खरे की, करारात बांधकाम चांगल्याप्रतीचे करायचे असा आम्ही केलेला असतो. हे खरे की, त्या करारात बांधकाम चांगल्या प्रतीचे करायचे अशी हमी आम्ही दिलेली असते.

प्रश्न – बांधकाम निकृष्ठ दर्जाचे झाले तर होणाऱ्या नुकसानाची भरपाई तुम्ही कराल असा करारात उल्लेख असतो ?

उत्तर – या करारात तसा उल्लेख नाही.

१३. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर ते निकृष्ठ दर्जाचे झाले असल्यास त्याची जबाबदारी आमची नसते. हे खरे की, करारपत्रात किती चौरस फुट काम करायचे याचा उल्लेख असतो. हे खरे की, करारपत्रात रकमेच्या हप्तांचा उल्लेख असतो. हे खरे की, ते

हप्ते आम्ही अॅडव्हान्स पासून चालू करतो. हे खरे की, अॅडव्हान्स स्वीकारल्यानंतर पुढील कामाचा जो टप्पा ठरला असेल तो पुर्ण झाल्यानंतर आम्ही पुढील हप्ता घेतो. हे खरे की, दिनांक ०४/०३/२०१८ रोजीचा करार हा आरोपी सोबत केलेला नाही. हे खरे की, या करारात बांधकाम एकत्र कुटूंबाकरीता करत आहोत असा उल्लेख नाही. हे खरे की, या करारात तसा उल्लेख करायला मला काही अडचण नव्हती. हे खरे की, या करारात लिहून घेणार, देणार अगर ओळख व साक्षीदार म्हणून आरोपीची सही घेण्यास काही अडचण नव्हती.

आरोपीतर्फे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

दि. १६/०३/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.